अहवाल

*देश आणि संस्कृतीविषयी नेदरलॅंडचे नागरिक कमालीचे संवेदनशील.*

- डॉ. आनंदी शिंदे

'नेदरलॅंड हा क्षेत्रफळाने महाराष्ट्र राज्यापेक्षाही खूप लहान देश आहे. मात्र तरीही तो स्वयंपूर्ण आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर विविधरंगी फुलांचा देश अशी त्याची ओळख आहे. लहान असूनही या देशाने अनेक क्षेत्रात केलेली प्रगती नेत्रदीपक आहे. स्वतःचा देश आणि संस्कृतीविषयी इथले नागरिक कमालीचे जागृत आणि संवेदनशील आहेत. ते सतत काळाच्या पुढचा विचार करतात. त्यांच्या जगण्यात शिस्तीला आणि व्यायामाला कमालीचे महत्त्व आहे. आपल्या देशाविषयी त्यांना अभिमान आहे. स्वतःचे काम स्वतः करण्याला ते प्राधान्य देतात. काम हा त्यांच्या जीवनशैलीचा प्राण आहे.' असा अनुभव डॉ. आनंदी शिंदे यांनी कथन केला.

येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील मराठी आणि हिंदी या भाषा विभागांच्यावतीने अनुभवकथनपर  लेखन या विषयावर आयोजित प्रकल्प लेखन कार्यशाळेत नेदरलॅंड दौऱ्याच्या अनुभवकथनावर आधारित 'सांगायच उद्देश काय...' या विषयावर प्रमुख वक्त्या म्हणून त्या बोलत होत्या. प्रा. सुजाता चोपडे कार्यक्रमाच्या अध्यक्ष होत्या.

अनुभवकथन करताना आपल्या भाषणात त्या पुढे म्हणाल्या, 'नेदरलॅंडमध्ये शिक्षण आणि प्रशिक्षणाला कमालीचे महत्त्व आहे. शिक्षणासाठी मुलांना शासनाकडून शिष्यवृत्त्या दिल्या जातात. मुलांच्या शिक्षणाचा खर्च शासन करते. मुलांचा कल विचारात घेऊन शिक्षण दिले जाते. स्वतःच्या करियरचा निर्णय स्वतः मुलंच घेतात. प्रात्यक्षिकांवर भर दिला जातो. शिक्षणव्यवस्थेत  बुद्ध्यांक आणि मानसिक वयाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रत्येक शाळेत मानसोपचारतज्ज्ञ नेमलेला असतो.'

प्रा. सुजाता चोपडे यांचे यावेळी भाषण झाले. यावेळी प्रा. एकनाथ पाटील, डॉ. अंगद पाटील, प्रा. अश्विनी थोरात उपस्थित होते. डॉ. प्रकाश आठवले यांनी प्रास्ताविक केले. प्रा. जावेद शेख यांनी आभार मानले.



कर्मवीर कॉलेजमध्ये भाषा विभागांच्यावतीने आयोजित कार्यशाळेत बोलताना डॉ. आनंदी शिंदे. मंचावर प्रा. सुजाता चोपडे आणि डॉ. प्रकाश आठवले

पुण्य नगरी

In Short



**ईश्वरपूर : कर्मवीर कॉलेजमध्ये बोलताना डॉ. आनंदी शिंदे. डॉ. प्रकाश आठवले.**

# संस्कृतीविषयी नेदरलँडचे नागरिक संवेदनशील: डॉ. आनंदी शिंदे

**ईश्वरपूर / प्रतिनिधी :** नेदरलँड हा क्षेत्रफळाने महाराष्ट्र राज्यापेक्षाही खूप लहान देश आहे. तरीही तो स्वयंपूर्ण आहे. या देशाने अनेक क्षेत्रात केलेली प्रगती नेत्रदीपक आहे. स्वतःचा देश आणि संस्कृतीविषयी इथले नागरिक कमालीचे जागृत आणि संवेदनशील आहेत. ते सतत काळाच्या पुढचा विचार करतात. त्यांच्या जगण्यात शिस्तीला आणि व्यायामाला कमालीचे महत्त्व आहे. आपल्या देशाविषयी त्यांना अभिमान आहे. स्वतःचे काम स्वतः करण्याला ते प्राधान्य देतात. काम हा त्यांच्या जीवनशैलीचा प्राण आहे, असा अनुभव डॉ. आनंदी शिंदे यांनी कथन केला. येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील मराठी आणि हिंदी या भाषा विभागांच्यावतीने अनुभवकथनपर लेखन या विषयावर आयोजित प्रकल्प लेखन कार्यशाळेत प्रमुख वक्त्या म्हणून त्या बोलत होत्या. सुजाता चोपडे अध्यक्ष होत्या. एकनाथ पाटील, अंगद पाटील, अश्विनी थोरात उपस्थित होते. प्रकाश आठवले यांनी प्रास्ताविक केले. जावेद शेख यांनी आभार मानले.